N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** बुलढाणा शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0587 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/07/2023 05:16

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार
**Time Period (कालावधी):** पहर 8
**Date From (दिनांक पासून):** 08/07/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/07/2023
**Time From (वेळेपासून):** 22:05 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 22:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 09/07/2023 **Time (वेळ):** 05:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 007
**Date & Time (दिनाक आणि वेळ):** 09/07/2023 05:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** बुलढाणा ते चिखली रोडवर हाजी मलंग दर्यासमोर बुलडाणा, बुलडाणा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. छगन बाबुलाल राठोड

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1980

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ह मु शिवशंकर नगर,बुलडाणा ,बुलढाणा शहर,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | चिंचपूर ता खामगांव, , जि बुलढाणा, , बुलढाणा, ,हिवरखेड,बुलढाणा, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. अच्युतराव माणिकराव काकडे | | | 1. गौतम नगर, येळगांव, बुलढाणा , बुलढाणा ,बुलढाणा शहर, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

फि ने आज रोजी लेखी फिर्याद दिले वरुन

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 दराचा 70 नोटा | 35,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

35,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

**S.No.** **UIDB Number**
**(अ.क्र.)** **(यु.आय.डी.बी.क्र.)**

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा दि 09/07/2023
श्री. छगन बाबुलाल राठोड, वय 43 वर्ष, व्यवसाय-खाजगी नोकरी, रा. चिंचपूर ता. खामगाव, जि. बुलढाणा, ह. मु. शिवशंकर नगर बुलढाणा, ता. जि. बुलढाणा मो.क्र. 9881777730

मी समक्ष टंकलिखीत फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन वर नमुद ठिकाणी कुटूंबासह राहतो. तसेच लक्ष्मीनारायण क्रिएशन, बुलढाणा या फर्म अंतर्गत करण्यात येणाऱ्या/ केलेल्या सर्व कामावर देखरेख करून बिलासंबधीचे कामे मीच पाहतो. त्याबाबत लक्ष्मीनारायण क्रिएशनचे मालक श्री. नितीन रोहीदास राठोड यांनी मला अधिकारपत्र करून दिलेले आहे..मी दिनांक 08.07.2023 रोजी पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा यांचेकडे लेखी तक्रारदार दिली की, ग्राम जयरामगढ ता. खामगाव येथे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकाचे वस्ती सुधार योजनेअंतर्गत अनुसुचित जाती व नवबौध्द वस्तीतील पेव्हर ब्लॉक रस्त्याचे कामाकरिता लागणारे सर्व साहीत्य तसेच मनुष्यबळ आमचे वरील फर्म मार्फत पुरविण्यात आलेले असून त्याचे एकूण 6,00,000 /- रुपये बिल झालेले आहे. त्यापैकी काही बिले अदा करण्यात आली असून अदा करण्यात आलेल्या बिलाचा मोबदला तसेच उर्वरीत 60,000/- रुपये बिलाचा चेक देण्यासाठी ग्रामपंचायत जयरामगढ येथील श्री.. अच्युतराव काकडे, पद ग्रामसेवक हे एकूण सहा लाख रुपये बिलाचे सहा टक्के प्रमाणे 36,000 / रुपये लाचेची मागणी करीत असून त्यांनी मला दिनाक 08.07.2023 रोजी लाच रक्कम घेवून बुलढाणा येथे बोलाविले असल्याबाबत लेखी तक्रार दिली होती. त्यावरुन मा. पोलीस उपअधिक्षक श्रीमती घोगरे मॅडम यांनी सदर तक्रार पुढील कार्यवाहीकरिता श्री. सचिन इंगळे, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांचेकडे दिली. त्यानुसार पोलीस निरीक्षक इंगळे साहेब यांनी आगार व्यवस्थापक, राज्य परीवहन महामंडळ, बुलढाणा आगार येथून दोन शासकीय कर्मचारी यांना पंच म्हणून उपलब्ध करुन घेवून त्याचा व माझा आपसात परीचय करुन देवून पडताळणी पुर्व पंचनाम्याप्रमाणे सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डर बाबत सुचना दिल्या, त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पूर्व पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीप्रमाणे यातील लोकसेवक श्री. अच्युतराव काकडे हे माझेकडे लाचमागणी करतात काय? याबाबत लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजित करणे असल्याने पोलीस निरीक्षक श्री. इंगळे साहेब यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी लोकसेवक श्री. काकडे, ग्रामसेवक यांना भेटण्यासाठी कोठे येवू याबाबत फोनवर विचारणा केली असता त्यांनी मला स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा सुंदरखेड (बुलढाणा) येथे भेटण्यास बोलाविले. त्यानुसार पो.नि. इंगळे साहेब यांनी माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन शर्टाचे आतून बाहेरुन दिसणार नाही अशाप्रकारे गळ्यात लटकावून पंच क्र. 1 श्री सुनिल बिलारी यांचेसह माझे खाजगी मोटार सायकलने 19:30 वा. रवाना केले. त्यावेळी मी व पंच असे आम्ही स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा सुंदरखेड से समोर जावून लोकसेवक श्री. अच्युतराव काकडे यांची भेट घेतली असता झालेल्या भेटीदरम्यान आमच्यात बिलासंबधाने चर्चा करून मी त्यांना म्हणालो की, मग तुम्ही सांगा न नेमक कसं करायच? त्यावेळी लोकसेवक काकडे म्हणाले की, आता सहा प्रमाण लावून टाका आता मी काही जास्त ताणून मी म्हटल त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, सहा प्रमाण म्हणजे छत्तीस हजार होतात ते त्यावेळी लोकसेवक काकडे म्हणाले की, हा यावेळी मी त्यांना म्हणालो की, किती होतात? त्यावेळी लोकसेवक काकडे म्हणाले की, छत्तीसच न. एक काम करा पस्तीस, छत्तीसच्या ऐवजी पस्तीस द्या सरळ सरळ पस्तीस द्या आता असे म्हणून मला पंच क्र. श्री बिलारी यांचे समक्ष तडजोडीअंती 35,000/- रुपये लाचेची मागणी केल्याने आम्ही लाप्रवि कार्यालयात परत आलो. त्यावेळी पो.नि. इंगळे साहेब यांनी माझेत व लोकसेवक श्री काकडे यांचेत लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकून लोकसेवक श्री. अच्युतराव काकडे यांची तडजोडीअंती 35000/- रुपये लाच मागणी असल्याबाबत खात्री केली. त्यानंतर लोकसेवक श्री. काकडे यांनी लाच रक्कम घेवून थोड्या वेळाने बोलाविले असल्याने सदर प्रकरणात सर्वानुमते दिनाक 08.07.2023 रोजीच सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे ठरविण्यात आले त्यानंतर पो नि इंगळे साहेब यांनी माझेकडे लोकसेवक श्री

काकडे यानी लाच मागणी केल्याप्रमाणे त्यांना देण्यासाठी 35000/- रुपये हजर करण्यास सांगीतले असता मी माझेजवळ असलेले 35000/- रुपये ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या 70 भारतीय चलनातील नोटा अश्या पो नि: इंगळे साहेब यांचेकडे हजर केल्या असता सदर नोटाचे क्रमांक हे सापळा पथकाचे मदतीने लिहून घेवून त्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रकीया पुर्ण झाल्यानंतर लाचेची रक्कम ही माझे शर्टचे डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवून दिली त्यानंतर पोलीस निरीक्षक इंगळे साहेब याचे सुचनेनुसार लोकसेवक काकडे याना लाच रक्कम कोठे घेवून येवू याबाबत फोनवर विचारणा केली असता, त्यांनी मला बुलढाणा ते चिखली रोडवर असलेल्या हाजी मलंग दर्ग्यासमोर बोलाविले त्यावरुन सर्वानुमते बुलढाणा ते चिखली रोडवर असलेल्या हाजी मलंग दर्यासमोर सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले त्यानुसार इंगळे साहेब यांनी मला सापळा पंचनाम्याप्रमाणे आवश्यक त्या सुचना देवून माझेकडे पुन्हा व्हॉईस रेकॉर्डर चालू करून मला व पंच क्र 1 यांना माझे मोटार सायकलने हाजी मलंग दर्ग्याकडे 21.53 वा. रवाना केले. त्यावेळी पो. नि. इंगळे साहेब तसेच सापळा पथक व पंच क्र 2 असे शासकीय वाहनाने हाजी मलंग दर्ग्याकडे रवाना होवून हाजी मलंग दर्यासमोर 21:58 वा. रितसर सापळा कार्यवाही आयोजीत केली असता. सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री. काकडे याची भेट घेतली त्यावेळी झालेल्या भेटीदरम्यान पेव्हर ब्लॉकचे रस्त्याचे उर्वरीत बिलासंबंधी चर्चा केली त्यावेळी लोकसेवक श्री काकडे यांनी उजव्या हाताची बोटे हलवून लाच रक्कम देण्याबाबत इशारा केला असता मी माझे शर्टचे डाव्या बाजुच्या खिश्यातील लाचेची रक्कम काढून लोकसेवक श्री. काकडे यांचे समोर धरुन म्हणालो की, हं हात मारुन घ्या, त्यावेळी लोकसेवक काकडे म्हणाले की, किती आहे? त्यावेळी मी सापळा पथकाने लोकसेवक यांना ताब्यात घेई पर्यंत तो माझ्याशी बोलण्यात व पैसे मोजून घेण्यात व्यस्त रहावे या उद्देशाने त्यांना लाच रक्कम ही एकतीस हजार रुपये आहे असे सांगीतले, त्यावेळी लोकसेवक काकडे म्हणाले की, नाही न परत पुन्हा केले होते न कमी, त्यावेळी मी त्यांना पुन्हा ते व्यस्त रहावे म्हणून एकतीस असतील ना हात मारुन घ्या खरचं न असे म्हणून लाच रक्कम स्विकारलबाबतचा नियोजित इशारा केला असता त्यावेळी पो.नि. इंगळे साहेब, व सापळा पथक असे आमचे जवळ आले व त्यांनी लोकसेवक श्री. काकडे यांना माझेकडून लाच रक्कम स्विकारले प्रकरणी ताब्यात घेवून लोकसेवक काकडे यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. अच्युतराव माणिकराव काकडे, वय 38 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद ग्रामसेवक, वर्ग-3 ग्रामपंचायत पिंप्री धनगर, अतिरिक्त पदभार ग्रामपंचायत जयरामगड, पंचायत समीती कार्यालय खामगांव, रा. गौतम नगर, येळगांव, बुलढाणा असे सांगीतले. त्यानंतर झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.तरी लोकसेवक श्री. अच्युतराव माणिकराव काकडे, वय 38 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद ग्रामसेवक, वर्ग-3 ग्रामपंचायत पिंप्री धनगर, अतिरिक्त पदभार ग्रामपंचायत जयरामगड, पंचायत समीती कार्यालय खामगांव, रा. गौतम नगर, येळगांव, बुलढाणा यांनी आमचे लक्ष्मीनारायण क्रिएशन फर्मव्दारे ग्राम जयरामगढ ता. खामगांव येथे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचे वस्ती सुधार योजनेअंतर्गत अनुसुचित जाती व नवबौध्द वस्तीतील पेव्हर ब्लॉक रस्त्याचे कामाकरिता पुरविण्यात आलेल्या साहीत्य तसेच मनुष्यबळाचे एकूण 6,00,000/- रुपये बिलाचे सहा टक्के प्रमाणे 36000/- रुपये मागणी करुन तडजोडीअंती 35000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारण्यास संमती दर्शवली त्यावरुन आयोजीत करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री. काकडे यांनी लाच रक्कम 35000/- रुपये दिनांक 08.07.2023 रोजी बुलढाणा ते चिखली रोडवर असलेल्या हाजी मलंग दर्यासमोर 22:05 वा. स्वतः स्विकारली आहे. आरोपीताचे वरील कृत्य हे कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे गुन्हा होत असल्याने मी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद देत आहे अशा फि चे लेखी फिर्याद वरुन अप सदरचा दाखल करुन तपास मा पोलीस निरीक्षक सचीन मधुकर इंगळे वय 33 वर्ष अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा यांचे कडे देण्यात आला.

5

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PRALHAD KISANRAO KATKAR(I (Inspector)) / POBN50094 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PRALHAD KISANRAC
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN50094

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | चेचक के दाग: NO |
| 1 | पुरुष | | | | | |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)